# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

अ प्रभाग समिती

सभावृतांत [कार्यपत्रिका क्रमांक 10]

दिनांक : 16/2/2018 वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी 2018 ची मासिक सभा शुक्रवार दिनांक 16/2/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. केशव हनुमंत घोळवे सभापती
2. मा. अनुराधा गणपत गोरखे सदस्या
3. मा. यादव मिनल विशाल सदस्या
4. मा. प्रमोद कुटे सदस्य
5. मा. शैलजा अविनाश मोरे सदस्या / उपमहापौर
6. मा. बाबर शर्मिला राजू सदस्या
7. मा. कोमल दिपक मेवानी सदस्या
8. मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे सदस्य

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. संजय खाबडे- मा. कार्यकारी अभियंता, विदयुत, श्री. सतिश इंगळे – मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री संजय काशीद, श्री लक्ष्मीकांत कोल्हे, श्री. सुभाष काळे, श्री एम.आय. खोंद्रे, श्री. चंद्रकांत मुठाळ, – उपअभियंता, श्री कदम पी.जे. – लेखाधिकारी, श्री. अरुण सोनकुसरे – कार्यालय अधिक्षक , श्रीम. पल्लवी सासे - कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, श्री. एम.एम.पानसे – आरोग्य निरीक्षक , इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक :- 4** सन्मा. सदस्या/उपमहापौर शैलजा मोरे यांचा दि. 16/2/2018 चा प्रस्ताव

मदनलाल धिंग्रा मैदान आजपर्यंत फक्त फुटबॉल या खेळासाठी उपलब्ध होत होते. परंतु सर्व खेळासाठी सदरचे मैदान उपलब्ध होत नाही. तरी सदरचे मैदान सर्व खेळांना उपलब्ध करुन दयावे.

**विषय क्रमांक :- 5** सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा दि. 16/2/2018 चा प्रस्ताव

चिंचवड स्टेशन येथील लहुजी वस्ताद यांच्या स्मरणार्थ त्या चौकास **क्रांतीवीर लहुजी वस्ताद चौक** असे नामकरण करण्यात यावे / मान्यता देणेत यावी.

**विषय क्रमांक :- 6** सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा दि. 16/2/2018 रोजीचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे इमारतीस **पन्हाळगड** असे नामकरण करणेत यावे .

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 166
दिनांक 16/2/2018
सुचक: मा. कोमल मेवानी

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सन्मा. सदस्या कोमल दिपक मेवानी यांचेकडील दि. 6/2/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 19 बी ब्लॉक 3 व 4 या भागात सिंधी व इतर समाजाकरीता सभागृह बांधण्यात आले आहे. सदर सभागृहास पिंपरी चिंचवड नगरपालिकेचे **माजी उपनगराध्यक्ष स्वर्गीय चेतनदास मेवानी सभागृह** असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 167
दिनांक 16/2/2018
सुचक: मा. यादव मिनल

विषय क्रमांक 2
विभाग : विदयुत, अ क्षेत्रीय
अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. अक्षेका/वि/1/कावि/122/2018 दि.12/2/2018 रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रीय कार्यालयाचे विदयुत विभागाकडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरुन मासिक पगार बिले, अतिकालीन भत्ता बिले, सेवानिवृत्त कर्मचा-यांची अर्जित रजा रोखीकरणाची बिले खर्ची टाकण्यात येतात. सदर लेखाशिर्षावर सन 2017-18 या आर्थिक वर्षामध्ये र.रु. 4,00,00,000/- इतकी तरतूद करणेत आली होती. माहे ऑगस्ट 2017 मध्ये 10 % तरतूद कमी करुन र.रु. 3,60,00,000/- करणेत आली असून त्यापैकी र.रु. 3,39,80,220/- इतका खर्च झाला असून दि.31/1/2018 अखेर र.रु. 20,19,780/- इतकी शिल्लक आहे. तसेच अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर सन 2017-18 करीता र.रु. 3,00,000/- इतकी करणेत आली असून त्यापैकी र.रु. 2,93,741/- इतका खर्च झालेला असून र.रु. 6,259/- इतकी तरतूद दि. 31/1/2018 अखेर शिल्लक आहे.

तरी स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर माहे जानेवारी 18 मधील अतिकालीन भत्ता, पगार बिलासाठी व माहे फेब्रुवारी 18 पगार बिलांसाठी व अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील माहे जानेवारी 18 व फेब्रुवारी 18 बिलासाठी खालील प्रमाणे तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन 2017-18 ची तरतूद र.रु | दि. 31/1/2018 अखेर झालेला खर्च र.रु. | त्यावरील शिल्लक तरतूद र.रु. वर्ग करता येणारा लेखाशिर्ष | वर्ग करता येणारा लेखाशिर्ष | आवश्यक तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्थायी अस्थापना | 3,60,00,000/- | 3,39,80,220/- | 20,19,780/- | हायड्रोलीक गाडी भाडे तत्वावर पुरविणे | 20,00,000/- |
| 2 | अस्थायी अस्थापना | 3,00,000/- | 2,93,741/- | 6,259/- | रजा प्रवास भत्ता | 50,000/- |

तरी वर नमूद केलेप्रमाणे अ क्षेत्रीय [illegible] विभागाकडील स्थायी अस्थापनासाठी परिशिष्ठ क मधील हायड्रोलिक गाडी भाडे तत्वा[illegible] लेखाशिर्षावरुन र.रु 70,00,000/- मधून र.रु. 20,00,000/- व परिशिष्ठ अ रजा प्रवास भत्ता लेखाशिर्षावरुन र.रु. 2,00,000/- मधून र.रु. 50,000/- वर्ग करणेकामी महापालिका अधिनियम कलम 103 अनुसूची प्रकरण 7 [2] नुसार मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 168 विषय क्रमांक 3
दिनांक 16/2/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. प्रमोद कुटे अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ :- मा. सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचेकडील दि. 12/2/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील शुभश्री हौ. सोसायटी, आकुर्डी शेजारी सुरु असलेल्या क्रिडा व उदयानाला अ प्रभाग समितीमध्ये ठराव क्रमांक 29 दि 13/7/2016 प्रमाणे सदर क्रिडांगणास **कै. निवृत्ती भालेराव क्रिडांगण** व ठराव क्रमांक 34 दि. 13/7/2016 प्रमाणे उदयानास **कै. तुळसाआई पांढरकर उदयान** असे ठराव मंजुर झाले होते तरी यापुर्वी झालेल्या ठरावाप्रमाणे नाव न बदलता संबंधित पुर्ण प्रकल्पाला **जेष्ठ निरुपणकार महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब तथा नारायण विष्णू धर्माधिकारी उदयान व क्रिडांगण** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

ठराव क्रमांक 169 विषय क्रमांक 4
दिनांक 16/2/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सन्मा. सदस्या / उपमहापौर शैलजा मोरे यांचेकडील दि.16/2/2018 रोजीचा प्रस्ताव

मदनलाल धिंग्रा मैदान आजपर्यंत फक्त फुटबॉल या खेळासाठी उपलब्ध होत होते. परंतु सर्व खेळासाठी सदरचे मैदान उपलब्ध होत नाही. तरी सदरचे मैदान सर्व खेळांना उपलब्ध करुन देणेस तसेच सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांनी खंडोबामाळ मंदीरासमोरील जागेमध्ये मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करणे या उपसुचनेसह मा. क्रिडा समिती सभेकडे मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 170 विषय क्रमांक 5
दिनांक 16/2/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचेकडील दि:16/2/2018
रोजीचा प्रस्ताव

चिंचवड स्टेशन येथील लहुजी वस्ताद यांच्या स्मरणार्थ त्या चौकास **क्रांतीवीर लहुजी वस्ताद चौक** असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 171
दिनांक 16/2/2018
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 6
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ :- मा. सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचेकडील दि.16/2/2018
रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयास ठरलेनुसार **पन्हाळगड** याप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरीलप्रमाणे कामकाज झालेनंतर सन्मा. नगरसदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.

- मा. सभापती केशव घोळवे यांनी सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांनी नामकरणासंबंधी मांडलेला प्रस्तावाचे अनुषंगाने समक्ष जागेवर जाऊन व्हिजीट करणेत येईल. त्यानंतर प्रस्तुत नामकरणाबाबत पुढील मासिक सभेमध्ये निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. तसेच अ क्षेत्रीय कार्यालयाचे चार ही वॉर्डामध्ये अदयापही माजी सन्मा. नगरसदस्यांचे नावाचे, दिशादर्शक बोर्ड काढलेले नाहीत याबाबत प्रत्येक मिटींगमध्ये सुचना देऊन देखील कारवाई झालेली नाही. तरी पुढील आठ दिवसांचे आत यासंबंधी स्थापत्य विभागामार्फत माजी नगरसदस्यांचे नामफलक व दिशादर्शक बोर्ड काढण्याची कारवाई करुन तसा अहवाल मोबाईल व्हॉटसअप वर पाठविण्यात यावा अशा सुचना दिल्या.
- मा. उपमहापौर, शैलजा मोरे यांनी प्रभाग समितीमध्ये बरेचसे विषय मंजुर होतात परंतु त्यावर आतापर्यंत काहीच कारवाई झालेली दिसत नाही. यावर मा. सभापती केशव घोळवे यांनी अ प्रभाग समिती मध्ये माहे ऑगस्ट 2017 पासून आजतागायत झालेल्या मंजुर ठरावावर संबंधित विभागामार्फत करणेत आलेल्या कारवाईच्या अनुषंगाने पुढील आठ दिवसांमध्ये मंजुर ठरावाशी संबंधित सर्व अधिकारी यांचे समवेत आढावा मिटींग आयोजित करण्याच्या सुचना प्रशासन अधिकारी यांना दिल्या.
- सन्मा. सदस्या कोमल मेवानी यांनी त्यांचे वॉर्डामध्ये ब-याच ठिकाणी सुरवातीचे 15 मिनिटे खराब पाणी येत असल्याचा मुद्दा उपस्थित केला असता पाणीपुरवठयासंबंधी सदरचा भाग श्री अहिरे यांचेकडे असल्याने त्यांना याबाबत सुचना देण्यात येतील असे सांगण्यात आले.
- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांनी शाहूनगर, संभाजीनगर या भागात महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी पाईपलाईन गॅस सुरु केला आहे त्याप्रमाणे निगडी-प्राधिकरणामध्ये देखील सुरु करण्यासंबंधी मुद्दा उपस्थित केला असता संबंधित खात्याचे अधिकारी यांचे समवेत लवकरात लवकर मिटींग आयोजित करण्यात येईल असे सांगण्यात आले.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

[ केशव हनुमंत घोळवे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/149/2018 दि 21/2/2018

प्रशासन अधिकारी
**तथा सचिव, सभा शाखा**
**अ प्रभाग समिती,**
**निगडी-44**

प्रति,

**सर्व संबंधित** ------------------------